# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,

दिनांक :- २६/११/२०२०

## मा. महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०५

प्रति,

सन्मा. श्री./श्रीमती ____________________

नगरसेवक / नगरसेविका,

मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. ०४/१२/२०२० रोजी सकाळी १०.३० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती.

मा. महापौर यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

टिप :- सन्मा. पालिका सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, Online महासभेला Join होण्यासाठी खालील काही सुचना दिलेल्या आहेत.

| अ.क्र. | सुचना |
|---|---|
| 1. | आपणांस ईमेलद्वारे किंवा मोबाईलवर Video Conferencing ची Link पाठविण्यात येईल. |
| 2. | सदर Link ओपन केल्यावर येणारे Zoom Mobile App Download डाऊनलोड करुन Video Conference बैठकीत 15 मिनीटे अगोदर सहभाग घ्यावा. |
| 3. | डाव्या बाजुला खाली Mic च्या Symbol वर Click केल्यावर Call Over Internet चे बटन दाबावे. |
| 4. | सन्मा. पालिका सदस्यांनी सभा Join करताना आपले पूर्ण नाव व प्रभाग क्रमांक टाकून लॉगीन करावी. |
| 5. | सभा सुरु होण्याची वेळ सकाळी १०.३० ची जरी असली तरी सभेस Join होण्याची वेळ सकाळी १०.१५ ची आहे. |
| 6. | सन्मा. सदस्यांना सभेत बोलावयाचे असेल तेव्हा More मधील Raise Hand बटनावर Click करावे. यामुळे मा. महापौर यांना समजेल की, आपणास बोलायचे आहे. किंवा आपला हात वर करावा. तसेच मा. महापौर यांचे परवानगीने बोलावे. |
| 7. | कृपया सभेला Join होण्यासाठी हेडफोनचा वापर करावा. |
| 8. | सन्मा. पालिका सदस्यांना पाठविण्यात आलेली Link अन्य कोणत्याही व्यक्तीस Share करु नये. |
| 9. | Logout झाल्यास सभेमध्ये पुन्हा सहभागी होण्यासाठी User id आणि Password चा वापर करावा. |
| 10. | काहीही तांत्रिक अडचण भासल्यास पुढील क्रमांकावर संपर्क साधावा.<br>1) श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर - 8422811399<br>2) श्री. रवी परदेसी - 7977947161 |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा शुक्रवार दि. ०४/१२/२०२० सभा सुचना क्र. ०५

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - |
| -- | मागील सभांचे इतिवृत्तांत - निरंक |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - |
| ३१ | विशेष समित्यांवर तौलानीक संख्येप्रमाणे सदस्य घेणे. |
| ३२ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे |
| ३३ | महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत. |
| ३४ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. |
| ३५ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २, कलम ५(२)(ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे. |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| ३६ | पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ३७ | महानगरपालिकेचे विविध विभागाचे अभिलेख स्कॅनिंग डिजीटायझेशन करणेकामी खर्चास मंजूरी मिळणेबाबत. |
| ३८ | मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत पोलीस आयुक्तालय व पोलीस उपआयुक्त कार्यालयासाठी जागा भाड्याने देणे व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत. |
| ३९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (Construction & demolition waste (C & D)) संकलन, वाहतुक पुर्नचक्रीकरण करणे कामांच्या दरांना मान्यता देणेबाबत. |
| ४० | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १० मधील स्व. इंद्रबहादुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन "अभियान" या सामाजिक संस्थेला देणेबाबत. |
| ४१ | महानगरपालिकेच्या स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये आत्यावश्यक सेवेकरीता NICU कार्यान्वीत करणेबाबत. |
| ४२ | महाराष्ट्र शासनाने निलंबित केलेला मा. स्थायी समिती सभा दि. १७/०८/२०२०, ठराव क्र. २७ बाबत अभिवेदन सादर करणेबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २६ नोव्हेंबर २०२०

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/१२/२०२०

### नगरसचिव विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ३१ :- विशेष समित्यांवर तौलानीक संख्येप्रमाणे सदस्य घेणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून [महिला व बालकल्याण समितीसह] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत. त्या अनुषंगाने मा. महासभा दि. १८/०७/२०१८, ठराव क्र. २३ अन्वये पुढील विशेष समित्या गठित करून विशेष समित्यांची सदस्य संख्या ९ (नऊ) इतकी निश्चित केलेली आहे.

१) पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती

२) शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती

३) विधी व नियोजन समिती

४) आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती

वरील समितींवर नामनिर्देशित झालेल्या सदस्यांची मुदत संपुष्टात आलेली असुन, नवीन सदस्यांची नेमणूक होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट/आघाडी मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | काँग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

वरीलपैकी शिवसेना पक्षाच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, शिवसेना पक्षाचे सध्याचे तौलानिक संख्याबळ २१ इतके आहे. सद्यस्थितीत असलेल्या तौलानिक संख्याबळाचे प्रमाणात विशेष समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९४ x ९ = ५.८४ | ६ |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९४ x ९ = २.०१ | २ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९४ x ९ = १.१४ | १ |

तरी वरीलप्रमाणे विशेष समित्यांवर सदस्य नेमणुक करणेसाठी प्रस्तावित करण्यांत आहे.

(डॉ. विजय राठोड)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ०४ /१२/२०२०**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ३२ :-** **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे.**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेला अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून [नामनिर्देशित करता] येईल. परंतु अशा [नामनिर्देशित सदस्यांची संख्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.] हे सदस्य, [विहीत करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा मुदतीसाठी नामनिर्देशित] करण्यात येतील.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ कलम ३(२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील.

मा. महासभा दि. ५/०९/२०१९, ठराव क्र. ५७ अन्वये पालिका सदस्यामधून घ्यावयाची सदस्य संख्या ९, बिनसरकारी संघटनाचे प्रतिनिधी २ व आयुक्त पदसिध्द अध्यक्ष अशी एकुण १२ सदस्यांची वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट/आघाडी मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

वरीलपैकी शिवसेना पक्षाच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, शिवसेना पक्षाचे सध्याचे तौलानिक संख्याबळ २१ इतके आहे. सद्यस्थितीत असलेल्या तौलानिक संख्याबळाचे प्रमाणात महापालिका

सदस्यांमधून घ्यावयाचे सदस्य संख्येसाठी वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन (उदाहरणार्थ) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य | समिती सदस्य १२ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९४ x ९ = ५.८४ | ६ | ६१ ÷ ९४ x १२ = ७.७८ | ८ |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९४ x ९ = २.०१ | २ | २१ ÷ ९४ x १२ = २.६८ | ३ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९४ x ९ = १.१४ | १ | १२ ÷ ९४ x १२ = १.५३ | १ |

तरी वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून घ्यावयाची सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून घ्यावयाची सदस्य संख्या निश्चीत करुन, वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(डॉ. विजय राठोड)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४ /१२/२०२०

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ३३:-** महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक असुन, महानगरपालिकेतील गटाच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची तरतुद आहे. माता व बालकांच्या विविध कल्याणकारी योजना शासकिय धोरणाप्रमाणे राबविणे तसेच यासंबंधी नविन योजना सादर करून शासकिय धोरणाप्रमाणे कार्यन्वित करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र राहिल.

महानगरपालिका सभा कामकाज नियमचे कलम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात विशेष समित्यांकरिता सदस्य संख्या नमुद नाही. मा. महासभा दि. ५/९/२०१८, (दि. ४/९/२०१८ रोजीची तहकुब सभा) ठराव क्र. ५६ अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्यांची संख्या १५ इतकी निश्चित करुन ०१ वर्षाकरीता समिती गठित करण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | काँग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

वरीलपैकी शिवसेना पक्षाच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, शिवसेना पक्षाचे सध्याचे तौलानिक संख्याबळ २१ इतके आहे. सद्यस्थितीत असलेल्या तौलानिक संख्याबळाचे प्रमाणात महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन (उदाहरणार्थ) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य | मागील गठीत समिती सदस्य संख्या १५ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९४ x ९ = ५.८४ | ६ | ६१ ÷ ९४ x १५ = ९.७३ | १० |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९४ x ९ = २.०१ | २ | २१ ÷ ९४ x १५ = ३.३५ | ३ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९४ x ९ = १.१४ | १ | १२ ÷ ९४ x १५ = १.९१ | २ |

तरी महिला व बालकल्याण समितीची मुदत व सदस्य संख्या निश्चीत करुन, महिला व बालकल्याण समिती गठित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(डॉ. विजय राठोड)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/१२/२०२०

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ३४:-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(३) अन्वये स्थायी समिती सदस्यांपैकी खालील निम्मे (आठ) सदस्य माहे ऑक्टोबर २०२० च्या पहिल्या तारखेस निवृत्त होत आहेत.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे :-

| अ.क्र. | सदस्याचे नाव | | पक्ष / गट / आघाडीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ---- | भारतीय जनता पार्टी |
| ०२ | श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत | ---- | भारतीय जनता पार्टी |
| ०३ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | ---- | भारतीय जनता पार्टी |
| ०४ | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग | ---- | भारतीय जनता पार्टी |
| ०५ | श्रीम. निला बर्नाड सोंस | ---- | भारतीय जनता पार्टी |
| ०६ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | ---- | शिवसेना |
| ०७ | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | ---- | शिवसेना |
| ०८ | श्री. कमलेश यशवंत भोईर | ---- | शिवसेना |

निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भारतीय जनता पार्टीचे ५ सदस्य व शिवसेना पक्षाचे ३ सदस्य निवृत्त होत आहेत. मा. उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण२००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवि-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(३) अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(५) अन्वये नविन आठ सदस्यांची दोन वर्षासाठी नेमणूक होणेसाठी महासभेपूढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(डॉ. विजय राठोड)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/१२/२०२०

## //गोषवारा//

प्रकरण क्र. ३५ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २, कलम ५(२)(ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ५(२)(ब) व महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी केलेल्या पक्ष/गट/आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ |

शिवसेना पक्षाच्या एका सदस्याचे निधन झाल्याने शिवसेना पक्षाचे सद्याचे तौलानिक संख्याबळ २१ इतके आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील नियम ५(१) च्या परंतुकानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३१अ नुसार नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलानिक संख्याबळ विचारात घेऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे नोंदणी केलेल्या पक्ष/गट/आघाडीच्या तौलानिक संख्याबळाचे प्रमाणात नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.क्र. | पक्ष/गट/आघाडी | सदस्य संख्या व सरासरी | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९४ x ५ = ३.२४ | ३ |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९४ x ५ = १.११ | १ |
| ३ | कॉंग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९४ x ५ = ०.६३ | १ |

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२, नियम ४ मधील (क) ते (छ) मध्ये नमूद विशेष ज्ञान अथवा अनुभव असलेल्या ५ (पाच) व्यक्तींची महानगरपालिकेवर नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नियुक्तीकरिता दि. १०/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यत नामनिर्देशनपत्र स्विकारण्यासाठी वेळ निश्चित करण्यात आलेली होती. नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या मुदतीमध्ये ५ (पाच) जागांसाठी एकुण ०६ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल केलेली असुन, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष/गट/आघाडीचे नाव |
|---|---|---|
| १ | ॲड खान शफीक अहमद सादत खान | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
| २ | श्री. सिंह विक्रमप्रताप रमापती | शिवसेना |
| ३ | श्री. अजित भगवान पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री. भोसले अनिल बाबुराव | भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री. सोहनसिंह भागीरथसिंह राजपुरोहित | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. शर्मा भगवती तुगनचंद | भारतीय जनता पार्टी |

प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी दि. १३/०२/२०२० रोजी करण्यात आलेली असून, छाननी अंती सर्व नामनिर्देशनपत्र वैध असल्याचे घोषीत करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील कलम ५(१) नुसार नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी, सभागृहनेता, विरोधी पक्षनेता, आणि गटनेत्यांशी विचारविनीमय करणेसाठी आयुक्त यांनी दि. ०५/१०/२०२० व दि. २२/१०/२०२० रोजी आयुक्त दालन सभाकक्षात बैठक आयोजित केली असता सदर बैठकीस सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व सर्व गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये नामनिर्देशित सदस्य पदाच्या उमेदवारांबाबत प्राप्त तक्रारींवर चर्चा करण्यात आली. उक्त तक्रारी छाननी नंतर प्राप्त झालेल्या असल्याने, सदर तक्रारी फेटाळण्यात येत असल्याचे आयुक्त यांनी उक्त बैठकीत जाहिर केलेले आहे.

दि. २१/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये उमेदवार श्री. सोहनसिंह भागीरथसिंह राजपुरोहित यांनी नामनिर्देशित पालिका सदस्य पदाकरिता दाखल केलेले नामनिर्देशनपत्र मागे घेत असल्याचे कळवून नामनिर्देशनपत्र मागे घेतलेले आहे. याबाबत बैठकीस उपस्थीत भारतीय जनता पार्टीचे गटनेता यांना विचारणा केली असता, त्यांनी श्री. सोहनसिंह भागीरथसिंह राजपुरोहित यांचे नामनिर्देशनपत्र मागे घेण्यास होकार दर्शवून, भारतीय जनता पार्टीतर्फे पुरस्कृत इतर तीन उमेदवारांची नावे नामनिर्देशित पालिका सदस्य पदाकरिता अंतिम करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच शिवसेना व कॉग्रेस लोकशाही आघाडीच्या गटनेत्यांनी त्यांचे पक्षाचे/गटाचे/आघाडीतर्फे पुरस्कृत प्रत्येकी एका उमेदवारांची नावे नामनिर्देशित पालिका सदस्य पदाकरिता अंतिम करण्यास मान्यता दिलेली आहे.

दि. २२/१०/२०२० रोजीच्या बैठकीमध्ये सभागृहनेता, विरोधी पक्षनेता व सर्व गटनेता यांचेशी विचार विनीमय करुन नामनिर्देशित पालिका सदस्य पदाकरिता तौलानिक संख्याबळाच्या प्रमाणात पुढील ५ (पाच) पात्र उमेदवारांची नावे शिफारस करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष/गट/आघाडीचे नाव |
|---|---|---|
| १ | ॲड खान शफीक अहमद सादत खान | काँग्रेस लोकशाही आघाडी |
| २ | श्री. सिंह विक्रमप्रताप रमापती | शिवसेना |
| ३ | श्री. अजित भगवान पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री. भोसले अनिल बाबुराव | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्री. शर्मा भगवती तुगनचंद | भारतीय जनता पार्टी |

वर नमुद केल्याप्रमाणे भारतीय जनता पार्टी ३, शिवसेना पक्ष १ व काँग्रेस लोकशाही आघाडी १ असे एकुण ५ (पाच) नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नियुक्ती करणेसाठी शिफारस करण्यांत येत आहे.

(डॉ. विजय राठोड)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ०९/११/२०२० वेळ ५:००
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. ....९०...... वर्ष : २०२०-२१

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा सभा दि. ०४/१२ /2020**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ३६ ):-** पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र लेखा सहीता 1971 नमुना क्र.10 नियम 30 (3)**

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | सार्व. बांधकामे (पृ.क्र.41) | महापौर निवास (पृ.क्र.42) | 200.00 | 34.33 | 165.67 | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 01 (पृ.क्र.34) | 110.00 | 90.42 | 75.00 | **"महापौर निवास"** या लेखाशिर्षात रु.200.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2021 पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "प्रभाग समिती निधी क्र.1 या लेखाशिर्षाखाली रु.75.00 लक्ष व प्रभाग समिती निधी क्र.3" या लेखाशिर्षाखाली रु.75.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 03 (पृ.क्र.34) | 200.00 | 22.48 | 75.00 | |
| 2 | विकास आराखडा अंमलबजावणी (पृ.क्र.46) | महिला भवन बांधणे (पृ.क्र.46) | 300.00 | - | 300.00 | विशेष निधी (पृ.क्र.34) | नगरसेवक स्वेच्छा निधी (पृ.क्र.34) | 1500.00 | 425.07 | 290 | **"महिला भवन बांधणे"** या लेखाशिर्षात रु.300.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2021 पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "नगरसेवक निधी" या लेखाशिर्षाखाली रु.290.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 3 | सार्व. बांधकामे (पृ.क्र.41) | ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणे. (पृ.क्र.43) | 100.00 | 3.95 | 96.05 | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 05 (पृ.क्र.34) | 120.00 | 9.99 | 80.00 | **"ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणे"** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2021 पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "प्रभाग समिती निधी क्र.5 या लेखाशिर्षाखाली रु.80.00 लक्ष व "प्रभाग समिती निधी क्र.4 या लेखाशिर्षाखाली रु.10.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 04 (पृ.क्र.34) | 200.00 | 74.70 | 10.00 | |
| 4 | सार्व. बांधकामे (पृ.क्र.41) | आर.टी.ओ. ट्रॅक बांधकाम (पृ.क्र.43) | 100.00 | | 100.00 | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 06 (पृ.क्र.34) | 200.00 | 138.96 | 80.00 | **"आर.टी.ओ. ट्रॅक बांधकाम"** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2021 पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "प्रभाग समिती निधी क्र.6 या लेखाशिर्षाखाली रु.80.00 लक्ष व "प्रभाग समिती निधी क्र.2 या लेखाशिर्षाखाली रु.15.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 02 (पृ.क्र.34) | 120.00 | 55.43 | 15.00 | |
| 5 | सार्व. बांधकामे (पृ.क्र.41) | भाईंदर स्टेशन जैसल पार्क सब-वे/ जुने रेल्वे फाटक (पृ.क्र.42) | 50.00 | - | 50.00 | बाजारपेठा आणि कत्तलखाने (पृ.क्र.41) | मार्केट बांधकाम (पृ.क्र.41) | 50.00 | 50.00 | 45.00 | **"भाईंदर स्टेशन जैसल पार्क सब - वे / जुने रेल्वे फाटक"** या लेखाशिर्षात रु.50.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2021 पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "मार्केट बांधकाम" या लेखाशिर्षाखाली रु.45.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |

| या शिर्षातुन | | | | | | हया शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 6 | सार्व. बांधकामे (पृ.क्र.41) | महानगर पालिका मार्फत होर्डींग्ज, कॅन्टीलिवर उभारणे / रिक्षा स्टॅण्ड (पृ.क्र.43) | 150.00 | 12.19 | 137.81 | विशेष निधी (पृ.क्र.34) | महापौर स्वेच्छा निर्णय निधी (पृ.क्र.34) | 200.00 | 15.70 | 80.00 | **"महानगर पालिका मार्फत होर्डींग्ज, कॅन्टीलिवर उभारणे / रिक्षा स्टॅण्ड"** या लेखाशिर्षात रु.150.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2021 पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "महापौर स्वेच्छा निर्णय निधी" या लेखाशिर्षाखाली रु.80.00 लक्ष व "प्रभाग समिती निधी क्र.4 या लेखाशिर्षाखाली रु.55.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 04 (पृ.क्र.34) | 200.00 | 74.70 | 55.00 | |
| 7 | नविन विद्युत कामे (पृ.क्र.47) | सिग्नल यंत्रणा (नविन विद्युत कामे) (पृ.क्र.47) | 100.00 | - | 100.00 | विशेष निधी (पृ.क्र.34) | नगरसेवक स्वेच्छा निधी (पृ.क्र.34) | 1500.00 | 425.07 | 60.00 | **"सिग्नल यंत्रणा (नविन विद्युत कामे)"** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2021 पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "नगरसेवक निधी" या लेखाशिर्षाखाली रु.60.00 लक्ष व "प्रभाग समिती निधी क्र.2 या लेखाशिर्षाखाली रु.20.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 02 (पृ.क्र.34) | 120.00 | 55.43 | 20.00 | |
| 8 | विशेष निधी (पृ.क्र.34) | सौर उर्जा निधी / एल.ई.डी. | 150.00 | 6.83 | 143.16 | विशेष निधी (पृ.क्र.34) | उपमहापौर स्वेच्छा निर्णय निधी (पृ.क्र.34) | 125.00 | - | 50.00 | **"सौर उर्जा निधी / एल.ई.डी. बसविणे"** या लेखाशिर्षात रु.150.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2021 पर्यंत होणारा खर्च |

4

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | बसविणे (पृ.क्र.34) | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | सभापती, स्वेच्छा निर्णय निधी (पृ.क्र.34) | 100.00 | 97.04 | 50.00 | पहाता सदर लेखाशिर्षातुन "उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी" या लेखाशिर्षाखाली रु.50.00 लक्ष, "सभापती, स्थायी समिती स्वेच्छा निर्णय निधी" या लेखाशिर्षाखाली रु.50.00 लक्ष व "प्रभाग समिती निधी क्र.2 या लेखाशिर्षाखाली रु.25.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | प्रभाग समिती निधी क्र. 02 (पृ.क्र.34) | 120.00 | 55.43 | 25.00 | |

| अ.क्र. | रक्कम कमी केलेले लेखाशिर्ष | रक्कम |
|---|---|---|
| 1 | महापौर निवास | 150.00 लक्ष |
| 2 | महिला भवन बांधणे | 290.00 लक्ष |
| 3 | ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणे. | 90.00 लक्ष |
| 4 | आर.टी.ओ. ट्रॅक बांधकाम | 95.00 लक्ष |
| 5 | भाईंदर स्टेशन जैसल पार्क सब - वे / जुने रेल्वे फाटक | 45.00 लक्ष |
| 6 | महानगर पालिका मार्फत होर्डींग्ज, कॅन्टीलिवर उभारणे / रिक्षा स्टॅण्ड | 135.00 लक्ष |

| | | |
|---|---|---|
| 7 | सिग्नल यंत्रणा (नविन विद्युत कामे) | 80.00 लक्ष |
| 8 | सौर उर्जा निधी / एल.ई.डी. बसविणे | 125.00 लक्ष |

| अ.क्र. | रक्कम वाढविलेले लेखाशिर्ष | रक्कम |
|---|---|---|
| 1 | नगरसेवक स्वेच्छा निधी | 350.00 लक्ष |
| 2 | प्रभाग समिती निधी क्र. 01 | 75.00 लक्ष |
| 3 | प्रभाग समिती निधी क्र. 02 | 60.00 लक्ष |
| 4 | प्रभाग समिती निधी क्र. 03 | 75.00 लक्ष |
| 5 | प्रभाग समिती निधी क्र. 04 | 60.00 लक्ष |
| 6 | प्रभाग समिती निधी क्र. 05 | 80.00 लक्ष |
| 7 | प्रभाग समिती निधी क्र. 06 | 80.00 लक्ष |
| 8 | महापौर स्वेच्छा निर्णय निधी | 80.00 लक्ष |
| 9 | उपमहापौर स्वेच्छा निर्णय निधी | 50.00 लक्ष |
| 10 | सभापती, स्वेछा निर्णय निधी | 50.00 |
| 11 | मार्केट बांधकाम (पृ.क्र.41) | 50.00 |

वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यास शिफारस आहे.

(डॉ. विजय राठोड भाप्रसे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC10/20-21/DK/MG-1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## संगणक विभाग

## मा. महासभा दि.०४/१२/२०२०

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (३४) महानगरपालिकेचे विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणेकामी खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणे आवश्यक आहे. याकामी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन अभिलेख्यांची अंदाजित संख्या 86,00,000 प्राप्त झाली होती. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका RFP for Scanning and digitization of records of Mira Bhaindar Municipal Corporation करणेकामी जुने दस्तावेज व ५ वर्ष कालावधीत नविन निर्माण होणारे दस्तावेज स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणेकामाची https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१६/१०/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या. M/s.Genius Infotech या L1 निविदाधारकाचे वाटाघाटीनंतरचे दर स्वीकारणेस मा. निविदा समितीने दि.०८/०५/२०१८ रोजी शिफारस करण्यात आलेली आहे. याकामी M/s.Genius Infotech यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरास व कमी दर असलेल्या निविदाधारक M/s.Genius Infotech यांच्या निविदेस महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) नुसार मा. स्थायी समिती सभा दि.२९/०९/२०१८ रोजीच्या सभेमध्ये प्र.क्र. ८८, ठराव क्र.७४ व मा. स्थायी समिती सभा दि.०६/०६/२०१९ प्रकरण क्र.१४, ठराव क्र.१४ अन्वये ५ वर्ष कालावधीकरिता खालीलप्रमाणे मंजूर दराने मंजूरी प्राप्त झाली आहे.

| Sr.No. | Particular | Rate per unit in Rs. (अधिक GST) |
|---|---|---|
| A. | Document Scanning and Digitization Cost | |
| | A4/Legal | 0.61 |
| | A3 | 1.22 |
| | A2 | 1.22 |
| | A1 | 2.44 |

याकामी मा. स्थायी समितीच्या मंजुरीने रु.१,४७,७७,६३२/- खर्च झालेला आहे. महापालिकेच्या विविध विभागांची दस्तावेज स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणेबाबत मागणी केली जात आहे. पुढील उर्वरित कालावधीकरिता अंदाजे रु.२.५० कोटी खर्च अपेक्षित आहे. याकामी M/s.Genius Infotech यांचे ५ वर्षासाठी दर मंजूर असल्याने मंजूर दराने होणा-या खर्चास मा. आयुक्त सो. यांची दि.०१/१०/२०२० रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव मा.महासभेत मंजुरीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

(अजित मुठे)
उपायुक्त (संगणक)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 04/12/2020

## बांधकाम विभाग

## **// गोषवारा //**

प्रकरण क्रमांक ( 38 ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत पोलिस आयुक्तालय व पोलिस उपआयुक्त कार्यालयासाठी जागा भाडयाने देणे व खर्चास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

महाराष्ट्र शासन गृहविभागाकडील शासन निर्णय क्र.7316/प्र.क्र.104/पोल-3 दि.13/9/2019 अन्वये मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालय निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी भाडयाने जागा उपलब्ध करून देण्यासाठी मा. महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. महासभा दि.31/01/2020 ठराव क्र.97 अन्वये मा. महासभेने पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली. सदर समितीमध्ये आयुक्त, उपमहापौर, सभापती स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, सर्वपक्षीय गटनेते, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांचा समावेश होता. सदर समितीची दि.07/09/2020 रोजी बैठक होऊन खालील निर्णय एकमताने घेण्यात आले.

1) पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी मिरारोड (पूर्व) शांती गार्डन, सेक्टर 5, राष्ट्रसंत आचार्य श्री पद्मसागर सुरश्वरजी भवन ही पूर्ण इमारत रिकामी करुन दोन वर्ष मुदतीसाठी मनपाच्या नियमानूसार भडयाने देण्यात यावी. याबाबत भाडे दराचा करारनामा करण्यात यावा.
2) मिरारोड (पूर्व) कनकीया मधील आरक्षण क्र.249 ही इमारत पोलिस उपआयुक्त कार्यालयासाठी रिकामी करुन दोन वर्ष मुदतीसाठी मनपाच्या नियमानूसार भाडयाने देण्यात यावी याबाबत भाडे दराचा करारनामा करण्यात यावा.
3) पोलिस आयुक्तलयासाठी शासनाने मंजुर केलेल्या आरक्षण क्र.324 मधील 11815 चौमीटर ही जागा पोलिस विभागाने संपादीत करुन सदर जागेवर इमारत बांधण्याने काम तातडीने सुरू करावे.
4) सद्यास्थितीत मिरारोड (पूर्व) शांतीगार्डन, सेक्टर 5 येथील राष्ट्रसंत आचार्य श्री. पद्मसागर सुरश्वरजी भवन इमारतीमधील कार्यालये खालील ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावीत.
5) भाईंदर पश्चिम येथील अपर तहसिलदार कार्यालयासाठी पहिला मजला भाडयाने दिलेला असुन तळ मजल्यावर सेतु करावयाचा असल्याने सदर जागा भाडयाने देण्यात यावी.

6) पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी महानगरपालिकेमार्फत कंत्राटदाराच्या वार्षिक मंजुर दराने सदर कार्यालयातील आवश्यक कामे सुरु करुन कार्यालय तयार करण्यात यावे.

7) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रस्ता रुंदीकरणात नयानगर येथील जुने पोलिस स्टेशन इमारत, भाईंदर (प.) पोलिस स्टेशन समोरील मंदीर, काशिमिरा पोलिस स्टेशन समोरील गोडावुन व कुंपणभिंत बाधित होत आहे. काशिमिरा उड्डाणपुलाखालील काशिमिरा पोलिस स्टेशनची असलेली वाहने, एमआयडीसी येथील ईएसआयसी हॉस्पीटल च्या जागेतील वाहतुक विभागाची पार्कींग इत्यादी घोडबंदर सर्व्हे क्र. 233 मध्ये शिफ्ट करुन वरील प्रमाणे सर्व जागा महानगरपालिकेस रिकामी करुन देण्यात याव्यात. याबाबत पोलिस विभागाने त्वरीत कार्यवाही करावी.

8) मा. आयुक्त यांनी वरील प्रमाणे निर्णयाची अंमलबजावणी करावी.

सदर निर्णयानूसार पोलिस आयुक्त व पोलिस उपआयुक्त कार्यालयाकरीता इमारती उपलबध करून देण्यात आलेल्या आहेत, तसेच मनपाच्या सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु.49,96,350/- रकमेचे व आयुक्तालय कार्यालयासाठी मंजूर दराने रु.55,07,900/- रकमेचे अंदाजपत्रक करून काम सुरू करण्यात आलेले आहे. सदर खर्चासाठी अर्थसंकल्पात पुर्नविनियोजन करण्याची कार्यवाही करावी लागणार आहे.

मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यात येत असुन सदर कार्यालयासाठी शासकीय दराने भाडे ठरवून त्यास शासन मान्यता घेण्याची प्रक्रीया करण्यात येत आहे.

तरी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने घेतलेल्या निर्णयाना, शासकीय दराने भाडे आकारण्यास, सदर प्रस्तावित कामासाठी खर्चास, पुर्नविनियोजन करण्यास मा. महासभेची कार्योत्तर मान्यता देण्यास शिफारस आहे.

(डॉ विजय राठोड, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-04/2020-21/DK/MG-1

गोषवारा प्राप्त दि. 24/11/2020 वेळ 6:02:04 am
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 20 वर्ष :- 2020-21

24/11/2020
नगरसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. 04/12/2020

बांधकाम विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( 38 ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (Construction & demolition waste ( C & D )) संकलन, वाहतुक, पुर्नचक्रीकरण करणे कामांच्या दरांना मान्यता देणेबाबत..

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 लागु झाले आहेत. या नियमांतर्गत बांधकाम व निष्कासनानुसार कचरा निर्माते कचऱ्याची साठवणुक त्यांच्या जागेत करतील व अधिकृत कचरा संकलन केंद्रावर किंवा प्रक्रीया केंद्रावर सशुल्क जमा करतील. सदर नियमाची अंमलबजावणी 5 ते 10 लक्ष लोकसंख्या असलेल्या शहरांनी 24 महीन्यात करावयाची आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि.03/11/2018 ठराव क्र.99 अन्वये मिरा भाईंदर महानगपालिका क्षेत्रात बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 नुसार ठाणे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सीकडे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचरा देणेसाठी कार्यवाही करणेस तसेच बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 ची नागरीकांसाठी जाहीर सुचना प्रसिध्दी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुशंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. 7 मार्च 2019 रोजी पासुन वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी देऊन बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 लागु केलेले आहेत. ठाणे महानगरपालिकेचे नेमलेल्या मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. हे कंत्राटदार ठाणे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या धोरणानुसार व दरानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत काम करण्यास तयार असल्याने त्यांच्या मंजुर दराचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे दर मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. मा. महासभेच्या मान्यतेनुसार ठाणे महानगरपालिकेने ठरविलेले खालील दर शुल्क वर्ग प्रकारानुसार मंजुर आहेत.

"अ" लघु कचरा निर्माते : एक मेट्रीक टनापेक्षा कमी कचऱ्याची निर्मिती.

**पर्याय** : 1. कचरा संकलन व वाहतुक करुन अधिकृत कचरा संकलन केंद्रावर जमा केल्यास शुल्क नाही.

2. कचरा निर्मात्याने कचरा निर्मितीच्या ठिकाणाहून अभियोक्त्याकडे कचरा उचलण्याकरीता मागणी केल्यास शुल्क रु.1089/-

**"ब" मोठे कचरा निर्माते** : एक टन व त्याहुन अधिक व 20 टनापर्यंत कचऱ्याची निर्मिती

**पर्याय** : 1. संकलन, वाहतुक प्रक्रिया करिता शुल्क रु.1089/- प्रती मे.टन.

2. प्रक्रिया केंद्रावर कचरा संकलन वाहतुक करुन प्रक्रियेसाठी जमा केल्यास शुल्क रु.545/- प्रती मे.टन

**"क"** घाऊक कचरा निर्माते : 20 टनाहून अधिक प्रती दिन अथवा 300 टन प्रती महिना / प्रती प्रकल्प कचरा निर्मात्याने कचरा व्यवस्थापन आराखडा विहित नमुन्यात मंजुरीकरिता सादर करणे बंधनकारक आहे. घनकचरा प्रकल्प खात्याने 30 दिवसात मंजुर करुन निर्धारित शुल्क भरणा केल्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल. घाऊक कचरा निर्मात्याने कचऱ्याचे 4 प्रकारात वर्गीकरण करुन साठवणुक करणे बंधनकारक राहील. संबंधित घाऊक कचरा निर्मात्याने वर्गीकृत कचरा प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतुक केल्यास फक्त प्रक्रिया शुल्क रु.545/- प्रती मे.टन आकारण्यात येईल.

**"ड"** ठाणे महापालिकेमार्फत बांधकाम निष्कासन, रस्ते, विकास, इमारत बांधकाम इत्यादी स्थापत्य कामातुन निर्माण होणारा बांधकाम व निष्कासन कचरा संकलन व वाहतुक केल्यानंतर प्रक्रिया करणेकरिता रु.525/- प्रती मे.टन शुल्क आकारण्यात येईल. अभियोक्तामार्फत संकलन, वाहतुक व प्रक्रियेकरिता रु.1050/- प्रती मे.टन शुक्ल आकारण्यात येईल.

**"इ"** रस्ते, वीज पुरवठा, पाणी पुरवठा, मलनिस्सारण, दुरध्वनी इत्यादी भुमिगत सेवा पुरविण्याचे कामातुन निर्माण होणारा बांधकाम व निष्कासन कचरा संकलन व वाहतुक केल्यानंतर सदर कचऱ्याच्या प्रक्रियेसाठी रु.545/- प्रती टन शुल्क आकारण्यात येईल.

**"फ"** सार्वजनिक / ठिकाणी / रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला / सखल नदी / नाले / पाणथळ / तलाव / तिवरे / जंगल इत्यादी ठिकाणी अनधिकृतपणे व अनिर्बधपणे टाकलेला बांधकाम व निष्कासन कचऱ्याने संकलन, वाहतुक व प्रक्रिया या करीता अभियोक्त्यास 75% शुल्क अदा करण्यात येईल. उर्वरित दंड रुपात वसुल (म्हणजेच रु.788/- प्रती मे टन) झालेली रक्कम 90 दिवसात अभियोक्तास देण्यात येईल.

**दंड** : बांधकाम व निष्कासन कचरा निर्माते, वाहतुक ठेकेदार, शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था इत्यादीनी बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 चे पालन / पुर्तता न करण्याबाबत दंड रु.5000/- ते रु.20000/- विविध बाबींकरिता वसुल करण्यात येईल.

तथापी मा. स्थायी समिती सभा दि. 28/08/2019 ठराव क्र.51 अन्वये ठाणे महानगरपालिकेने नेमलेल्या मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. या कंत्राटदारास फक्त 6 महीन्याकरीता नेमावे व यापुढे बांधकाम व निष्कासन कचऱ्याची सदर कंत्राटरारामार्फत विल्हेवाट लावुन कचरा निर्माण करणाऱ्या मालकाकडुन सदर कंत्राटदाराने शुल्क आकारावे तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर प्रकल्प उभारणेची कार्यवाही करावी व त्याचा सविस्तर आराखडा मा. महासभेपुढे ठेवावा असा निर्णय घेतला.

सदर प्रस्तावाबाबत मा.महासभा दि.31/01/2020 ठराव क्र.82 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतले

1. सदर प्रकल्प मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावर, बांधा, वापरा व हस्तांतर करा पध्दतीने राबविण्यासाठी जागा उपलब्ध करुन प्रक्रिया करण्यात यावी.
2. सदर पध्दतीस प्रतिसाद न मिळाल्यास महानगरपालिकेमार्फत प्रकल्प राबविण्यासाठी निविदा प्रक्रीया करावी., मा.आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या हितानुसार कार्यवाही करावी.
3. सदर कामाच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

वरील ठरावानुसार महानगरपालिकेमार्फत सल्लागार नेमुन सदर प्रकल्पाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सदर प्रकल्प राबविण्यासाठी कुठेही 5 एकर क्षेत्राची जागा उपलब्ध नाही. तसेच सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेस टीपिंग फी द्यावी लागणार आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात डायघर येथे मे. मेट्रो वेस्ट हॅण्डलिंग प्रा.लि.या एजन्सीचा प्रकल्प सुरु असून ठाणे महानगरपालिकेसोबत झालेल्या करारनाम्यानुसार डायघर प्रकल्पाच्या 30 कि.मीटर परिघात असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाना देखील समाविष्ट करण्याचे नमुद असल्याने व मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र डायघर पासून 30 कि.मीटर च्या आत असल्याने ठाणे महानगरपालिकेने मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सदर एजन्सी सोबत करारनामा करणेस दि.11/09/2018 रोजी परवानगी दिलेली आहे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका मा.महासभा दि.03/11/2018 ठराव क्र.99 अन्वये ठाणे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सी कडे मनपा क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचरा (C & D) देणेस मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेनुसार मे.मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. हि एजन्सी ला विचारणा केली असता त्यांनी महानगरपालिकेस पत्र देऊन करारनामा करण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन इमारती, बांधकाम विविध विकासाची कामे, इमारती दुरुस्ती, अंतर्गत सजावटीची कामे या मधुन मोठ्या प्रमाणावर बांधकाम व निष्कासन कचरा निघत असल्याने व सदर कचऱ्यावर बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये प्रक्रिया करणे बंधनकारक असल्याने सदर कार्यवाही करणे क्रम प्राप्त आहे. सदर कचरा उचलण्यावर महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणावर खर्च येत असतो. ठाणे महानगरपालिकेने ठरविलेल्या उपरोक्त अहवालात नमुद प्रमाणे सदर खर्च संबंधितांनी महानगरपालिकेकडे जमा करावयाचा असून महानगरपालिकेमार्फत कंत्राटदार यांना अदा करावयाचा आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सदर कचरा प्रकल्प उभारणे व त्यांचे संकलन करणे महानगरपालिकेच्या हिताचे नाही. तसेच सदर प्रकल्पासाठी लागणारी 5 एकर जागा ही सी.आर.झेड विरहित व वन विभागाच्या बाहेरील परिक्षेत्रात तसेच सदर प्रकल्पाच्या ठिकाणी प्रक्रीया करताना मोठा आवाज होत असल्याने रहिवास क्षेत्रापासुन दुर अशी जागा देखिल उपलब्ध नाही.

सदर वस्तुस्थिती व महानगरपालिकेस आर्थिक भार पडणार नसल्याची वस्तुस्थिती पाहता ठाणे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या दरानुसार कंत्राटदारासोबत करारनामा करणेसाठी मान्यता देण्याचा विषय मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला आहे. तथापी सद्यस्थितीत मा. स्थायी समिती गठीत नसल्याने व समितीचे सर्व अधिकार मा. महासभेत असल्याने सदर प्रस्तावास मा. महासभेची मान्यता देण्यास शिफारस आहे.

(डॉ. विजय राठोड, भाप्रसे)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ ३८८/२०२०-२१ दिनांक :- २६/११/२०२०

प्रकरण क्र. ४२

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प्र./म.प.
आवक क्र. ४०/२०२०-२१.....
दिनांक:- २६/११/2020

प्रति,

नगरसचिव,

मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके इत्यादी ठिकाणच्या देखभाली करीता राबविलेली निविदा फेटाळण्याचा तसेच नव्याने निविदा मागविण्याबाबत स्थायी समितीने दि. 17/08/2020 रोजी पारीत केलेला ठराव क्र. 27 निलंबित करण्याबाबत.**

**संदर्भ :- नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1120/ प्र.क्र.46/ नवि-28 दि. 18/11/2020 रोजीचा शासन निर्णय.**

उपरोक्त विषयान्वये उदयान व वृक्षप्राधिकरण विभागातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके इत्यादी ठिकाणच्या देखभाल करणे कामाच्या निविदेबाबत. संदर्भिय शासन निर्णय पारीत केलेला आहे.

सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे. सदर बाबत मा. महापौर व मा. सभापती, स्थायी समिती यांना अवगत करावे.

उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र.४२

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके इत्यादी ठिकाणांच्या देखभालीकरिता राबविलेली निविदा फेटाळण्याचा तसेच नव्याने निविदा मागविण्याबाबत स्थायी समितीने दि.१७.०८.२०२० रोजी पारीत केलेला ठराव क्र.२७ निलंबित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:- मिभाम-११२०/प्र.क्र.४६/नवि-२८**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १८ नोव्हेंबर, २०२०

**संदर्भ:-** १) मिरा-भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभा ठराव क्र.२७, दि.१७.०८.२०२०.
२) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र.मनपा/वृप्रा/२२९/२०२०-२१, दि.२८.०९.२०२०.

**प्रस्तावना:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची उद्याने, स्मशाने, मैदाने, दुभाजके, चौपाट्या, नर्सरी इत्यादीची २ वर्षांसाठी देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी लागणारे साहित्य, सामुग्री व मजूर तसेच सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यासाठी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी ई-निविदा प्रक्रिया राबविली. सदर प्रक्रियेअंती न्यूनतम असलेल्या मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्विसेस या निविदाकाराची निविदा वाटाघाटी करून स्विकारण्याची निविदा समितीने दि.२४.०६.२०२० रोजी शिफारस केली आहे.

सदर निविदा स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर केली असता, समितीने निविदेचे अंदाजपत्रक तयार केले नसल्याचे तसेच महासभा ठराव क्र.२५, दि.०७.०६.२०१९ नुसार निविदा मागविली नसल्याचे कारण देत सदर निविदा फेटाळण्याचा ठराव क्र.२७, दि.१७.०८.२०२० पारीत केला व नव्याने निविदेचे अंदाजपत्रक तयार करून पुन्हा निविदा मागविण्याचे निर्देश दिले.

२. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या संदर्भाधीन दि.२८.०९.२०२० च्या पत्रात असे नमूद केले आहे की, मा.महासभा ठराव क्र.२५, दि.०७.०६.२०१९ अन्वये खालील कामांची एकत्रित निविदा काढण्याचा ठराव पारीत केला होता. तथापि, सदर मा. महासभेचा ठराव होण्याअगोदर सदर कामामधील काही कामाच्या वार्षिक निविदा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काढण्यात आलेल्या होत्या. त्यास मा.स्थायी समितीने वार्षिक निविदांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

अ) मा.महासभेच्या ठरावाप्रमाणे निगा व देखभालीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. तथापि, सुरक्षा रक्षक पुरवठ्याचे काम आस्थापना विभागामार्फत करण्यात येत असून, सदर कामी मा.महासभेने मुदतवाढ देऊन मंजुरी दिलेली आहे. शौचालय व पाणपोईच्या साफसफाईचा उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या निगा व देखभालीच्या अंदाजपत्रकामध्ये समावेश केलेला आहे. रंगरंगोटी, दुरुस्ती, विद्युत दुरुस्ती इ. कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वार्षिक निविदा काढून मा.स्थायी समितीने मंजुरी दिलेली असल्याने निगा व देखभाल अंदाजपत्रकामध्ये समावेश केलेला नाही.

**ब)** सुरक्षा रक्षक आस्थापना विभागामार्फत पुरवठा करण्यात येत असून, मा.महासभा ठराव क्र.१००, दि.०३.११.२०१८ अन्वये महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.०८.११.२००६ नुसार महानगरपालिकांनी सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असल्यास सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांच्याकडून सुरक्षा रक्षकांची मागणी करण्यात यावी, असे शासन निर्णयात नमूद केल्याचे दिसून येत आहे. त्यानुसार दि.०१.०८.२०१८ पासून ते सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरिता सानपाडा यांचेकडून माहिती येऊन पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यापर्यंतच्या कालावधीकरिता मे.सैनिक इंटेलिजन्स अँड सेक्युरिटी प्रा.लि. यांना मुदतवाढ देण्यास मा.महासभेने मंजुरी दिलेली आहे. तसेच सुरक्षा रक्षक पुरवठ्याचे कामकाज आस्थापना विभागामार्फत करण्यात येत आहे. त्यानुसार शासनाच्या गाईड लाईन नुसार सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्याकरिता निगा व देखभाल अंदाजपत्रकामध्ये सुरक्षा रक्षकाचा समावेश केलेला नाही.

**क)** मा.महासभा ठराव क्र.१४, दि.०७.०६.२०१९ अन्वये लालमाती, शेणखत व सफेद रेती पुरवठा करणे कामाची वार्षिक निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार उद्याने, मैदाने तसेच वृक्षारोपणाकरिता झाडांच्या मुळाभोवती टाकण्याकरिता लालमातीची आवश्यकता असल्याने सदर कामाची E-Tendering on-line पद्धतीने दि.०२.१२.२०१९ रोजी निविदा मागवून मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१४, दि.२६.०६.२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे.

**ड)** रंगरंगोटी व दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर कामाच्या वार्षिक निविदा मागवून मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२१, दि.११.०६.२०१९ मधील अ.क्र.२१ व २५ अन्वये उद्यान, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची दुरुस्ती व रंगकाम करणे कामाच्या वार्षिक निविदेस मंजुरी दिलेली आहे. तसेच सन २०२०-२१ करिता मा.महासभा ठराव क्र.०३, दि.१३.०८.२०२० अन्वये उद्याने, मैदाने, स्मशानभुमी, दफनभुमी, दुभाजके यांची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरिता अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

**इ)** मा.महासभा ठराव क्र.१४, दि.०७.०६.२०१९ अन्वये नवीन खेळणी, बेंचेस, व्यायामाचे साहित्य पुरवठा करून बसविणेकामी वार्षिक निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सदर कामाची E-Tendering On-line पद्धतीने दि.२२.०७.२०१९ रोजी निविदा मागवून मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१३, दि.२६०६.२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदर कामाचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

**ई)** सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्मशानभूमी व दफनभूमी, उद्याने/तलाव येथील विद्युत कामे देखभाल व दुरुस्ती करण्याकरिता वार्षिक निविदा मागवून मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२१, दि.११.०६.२०१९ मधील अ.क्र.१६ व १७ अन्वये विद्युत कामाच्या देखभाल व दुरुस्ती कामाच्या वार्षिक निविदेस मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे सदर कामाचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

त्यामुळे महासभा ठराव क्र.२५, दि.०७.०६.२०२० चे कोणत्याही प्रकारे उल्लघंन झालेले नाही. मिरा-भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभेने दि.१७.०८.२०२० रोजी पारीत केलेला ठराव क्र.२७ हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या

कलम-४५१ अन्वये शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करून विखंडीत करण्याची आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी विनंती केली आहे.

३. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी उक्त ठरावाच्या विखंडनाकरिता नमूद केलेली कारणमिमांसा विचारात घेता, सदर ठराव मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याचे स्पष्ट होत असल्याने, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेने पारित केलेला ठराव क्र.२७, दि.१७.०८.२०२० हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (१) अनुसार निलंबित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने पारित केलेला ठराव क्र.२७, दि.१७.०८.२०२० हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (१) नुसार निलंबित करण्यात येत आहे. याबाबत संबंधितांना काही अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांनी ३० दिवसांत सादर करावे. विहीत मुदतीत अभिवेदन सादर न झाल्यास अधिनियमाच्या कलम-४५१ (३) नुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२०१११८१५२३२७२८२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a[illegible] 2fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271[illegible] 388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2020.11.20 15:54:35 +05'30'

(नवनाथ रा. वाठ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.मंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा ठाणे.
५) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा ठाणे.
६) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) निवडनस्ती (नवि-२८).